


।। सदानंदो विजयते ।।

यज्ञ - दर्शन

संस्थेचे माहितीपत्रक

संपादक - प्रकाश पवार (पाटील)

पुष्प १४ वे



अग्नीदेवता

प्रस्तावना :

सर्वसाधारणपणे मनुष्य जीवनात अग्नीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अग्नीचे नाव घेतले की, डोळ्यासमोर येतात त्या अग्नीच्या धगधगणाऱ्या ज्वाळा. पण ही देवताही आहे, तिला सुगणरूपही आहे, हे समजून घेणे तितकेच गरजेचे आहे.

प्राणज्योत असे आपण म्हणतो, तोही अग्नीच आणि शेवटी प्राणज्योत मावळल्यानंतर (मृत्यूनंतर) देहाचा अंत ज्याच्यात होतो तोही अग्नीच. म्हणजे आपल्या जीवनाच्या 'अथ'पासून 'इति' पर्यंत त्या अग्नीची संगत अगदी जवळची आणि रोजची असते. आपल्या रोजच्या जीवनात अग्नीचा उपयोग व उपभोग योग्य रीतीने घेतला तर आपले आयुष्य सुखमय, कल्याणकारी, आरोग्यदायी होऊन प्रगतीपथावर जाण्यास मदत होते ते अग्नीमुळेच. कारण अग्नी हा उर्ध्वगामी म्हणजे वर जाणारा आहे. 'अग्नीची उपासना श्रेष्ठ उपासना आहे' असा उल्लेख वेदांमध्ये आणि उपनिषदांमध्ये सापडतो.

उदा. औक्षवणाचा दिवा, देवघरात अखंड तेवणारा दिवा, स्वयंपाकासाठी वापरला जाणारा अग्नी, घरात रात्री प्रकाश देणारे विजेचे दिवे.

ह्या अग्नीचा व्यवस्थित सांभाळ केला गेला नाही तर हाच अग्नी आपल्याला भस्मसात केल्याशिवाय राहात नाही. तर हा अग्नी म्हणजे काय? हा असतो कुठे? व ह्याला देवता का म्हटलं आहे? 'पिंडी ते ब्रह्मांडी' या उक्तीप्रमाणे शरीरात असणारा अग्नी त्याला जठराग्नी म्हणतात तो कसा? हे आता आपण पाहू-

भगवान गोपाळकृष्णाने श्रीमद्‌भगवत्‌गीतेच्या पंधराव्या अध्यायात शरीरातील जठराग्नीचे स्वरूप सांगताना म्हटले आहे-

'अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहश्राश्रितः।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।।''

तसेच साधूसंत, महात्मे अग्नीसंबंधी सांगताना म्हणतात-

''काष्ठी अग्नि असोनी, गुप्त न दिसे कोणासी कार्यासी ये।
केल्या मंथन यज्ञ होम हवने, सर्वांसी कार्यासी ये।।

ज्याप्रमाणे जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी भगवंत आहे असे आपण म्हणतो. त्याचप्रमाणे जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी अग्नीचाही वास असतोच. उदाः- १) जळी - पाण्यापासून विद्युत निर्मिती होते. आणि पाण्याने भरलेले ढग एकमेकांवर घासून वीज निर्माण होते. २) स्थळी - रोजच्या व्यवहारात वापरला जाणारा सदृष्य अग्नी. ३. काष्ठी - लाकडात, तो घर्षणाने दिसतो, ४) पाषाणी - दगडामधील घर्षणाने तो दिसतो. म्हणजे अग्नी हा सर्वत्र व्यापक आहे. म्हणून हिला देवता म्हटलं आहे. देवता म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर एखादं सगुण रूप येतं. तसं अग्नीचंही सगुण रूप आहे. प्रत्यक्ष ऋषीमुनींना त्यांच्या साधनेतून, उपासनेतून ते दिसलं. ह्याला वेदांमध्ये आधार सापडतो.

अग्नीची स्तुती करताना ऋषी म्हणतात-

''सप्तहस्तश्चतुः श्रृंगः सप्तजिव्हो द्विशीर्षकः'

तसेच ऋग्वेदात इतर सर्व देवतांची सूक्ते आलेली आहेत, त्याचप्रमाणे अग्नीचीही सुमारे २०० सूक्ते अग्नीच्या स्तुतीसाठी आलेली आहेत.

त्यापैकी - १) ॐ चत्वारि श्रृंगा त्रयोअस्य पादा। २) अग्निंदुतं पुरो दधे। ३)ॐ अग्ने नय सुपथा राये अस्मान् ।

विविध कार्यांमधील अग्नीदेवतेची नावे व लौकिक कार्य ह्याप्रमाणे-

अग्नीची नावे	लौकीक कार्य
१) पावक	पाकक्रिया व यज्ञ
२) मारुत	पुंसवन (अठांगुळ)
३) पवमान	सर्व प्रकारचे शुभ कार्ये
४) शोभन	सर्व प्रकारचे शुभ कार्ये
५) मंगल	सामंतोन्नयन (वाङ्‌निश्चय)
६) प्रबल	जातकर्म संस्कार (जन्मानंतर वडीलांनी करायचा संस्कार)
७) पार्थिव	अन्नप्राशन संस्कार (उष्टावण)
८) सभ्य	चौलकर्म (मुंजीचे वेळी)
९) सूर्य	गोप्रदान विधी
१०) योजक	विवाह विधी
११) शिखी	चतुर्थीकरण विधी (विवाहानंतर ४थ्या दिवशी यज्ञ करताना
१२) धृति	कोणत्याही व्रतधारणेच्या आधी यज्ञ करताना
१३) रूक्मक	वैश्वदेवाचा अग्नी (ऋग्वेदी वैश्वदेवात पावक नाव आहे.)
१४) विट	प्रायश्चित्त विधीसाठी
१५) हव्यवाहन	देवांप्रीत्यर्थ केलेल्या यज्ञाचेवेळी (देवकार्यासाठी)
१६) कव्यवाहन	श्राद्ध- पक्षाचे वेळी (पितृकार्यासाठी)
१७) वरद	शांतीकर्माचे यज्ञाचे वेळी
१८) बलवर्धन	पुष्टीकर्मासाठी
१९) इड	पूर्णाहुति
२०) क्रोध	अभिचारकर्म, दुष्टकर्मासाठी (इंद्रजिताने केलेला यज्ञ)
२१) कामद	वशीकरण
२२) दूषक	वनदहनासाठी (खांडववन जाळताना)
२३) जठर	अन्नपचनासाठी
२४) क्रव्याद	प्रेमकर्मासाठी
२५) वह्नि	लक्ष संख्यात्मक होमाचा अग्नी
२६) अश्वर	वृषोत्सर्ग (बैलाचे दान)
२७) सुचय	ब्रह्मयज्ञ
२८) वडवाह	समुद्रातील अग्नी
२९) संवर्तक	क्षय
३०) हुताशन	कोटी संख्यात्मक होमाचा अग्नी
३१) गार्हपत्य	घरातील ब्रह्मकर्मासाठी, ब्रह्माच्या पूजेसाठी, प्रातः संध्येतील.
३२) दक्षिण	ईश्वराच्या (विशेषतः शंकराच्या) आराधनेसाठी, मध्याह्न संध्येसाठी,
३३) आहवनीय	विष्णूपूजनासाठी सायंसंध्येतील अग्नी
३४) त्रयोग्नी	चोवीस तासांच्या अग्निहोत्रातील अग्नीचे नाव

अनल, जातवेद, वैश्वानर, हुताशन ही अग्निदेवतेची नावे व त्यांचे लौकीक कार्य आहेत.

अग्नीदेवतेचे सगुणरूप (मूर्तरूप) वर्णन व दर्शन

ॐ चत्वारी श्रृंगा त्रयो अस्य पादा द्वै शीर्षे सप्त हस्ता सोऽअस्य।।

त्रिधा बद्धो वृषभो रोखीती । महो देवो मँर्त्या ऽ अविवेश ।।

मूर्तरूपात, सगुणरूपात अग्निदेवतेला ऋषींनी पाहिलं व वरीलप्रमाणे त्याचं वर्णन केलं. ते म्हणतात- ह्या देवतेला चार शिंगे आहेत. तीन पाय आहेत. दोन डोकी, सात हात यापैकी उजवीकडे चार आणि डावीकडे तीन असे हात आहेत. तसेच तो तीन ठिकाणी बांधला गेला आहे. त्याला सात जिव्हा आहेत व तो हसतमुख, प्रसन्नमुख आहे.

(क्रमशः)

इति वृतांत

१) दि. ११ जुलै २०१४ आषाढ शु. चतुर्दशी रोजी श्रीक्षेत्र ‘फळा’, ता. पालम, जि. परभणी येथे प्रतिवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही प.पू. प्रातःस्मरणीय गवामयन सत्र सोमयाजी दीक्षित श्री. रंगनाथ श्रीकृष्ण सेलूकर महाराज यांचा जन्मोत्सव अतिशय आनंदात व उत्साहात साजरा झाला.

२) दि. १२ जुलै २०१४ आषाढ पौर्णिमा रोजी गंगाखेड येथे प्रतीवर्षाप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सवात प. पू. प्रातःस्मरणीय गवामयन सत्र सोमयाजी दीक्षित श्री. रंगनाथ महाराजांचा पालखी मिरवणूक सोहळा विशेषत्वाने संपन्न झाला.

३) दि. २४ सप्टेंबर २०१४, अश्विन शु. प्रतिपदा रोजी गंगाखेड येथे प. पू. प्रातःस्मरणीय गवामय सत्र सोमयाजी दीक्षित श्री. रंगनाथ महाराज यांची ११वी पुण्यतिथी सोहळा सकाळी भजन, कीर्तन, त्यानंतर पालखी मिरवणूक व अन्नदान अशा रीतीने संपन्न झाला.

क्रमशः प्रसिद्ध होणारे श्रीसूक्त

महत्त्व व अर्थ

आदित्यवर्णे तपसोऽधि जातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः।
तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मीः ।।६।।

आदित्य-वर्णे -	हे तेजस्विनी	तस्य फलानि -	त्याची फले
तव तपसः-	तुझ्या तपापासून	तपसा -	तुझ्या कृपेने, माझ्या तपामुळे
वनस्पतिः -	वनस्पति म्ह.	माया-अन्तराया -	प्रतिबंधक भूल, मोह
बिल्वः वृक्षाः -	बेलाचे झाड	बाह्याः अलक्ष्मीः -	बाह्य दारिद्र्य
अधिजातः अथ-	उत्पन्न झाले	नुदन्तु -	दूर करोत

हे तेजस्विनी, तुझ्या तपातून वनस्पतीतील बिल्ववृक्ष निर्माण झाला. आता तुझ्या कृपेने व माझ्या तपामुळे त्याची फळे माझ्या विकासातील मायामोहाचे अडथळे आणि बाह्य जीवनातील दारिद्र्य दूर करोत.

वेदकाळी यज्ञात युपासाठी बेलाच्या झाडाचा व हवनासाठी बेलफळांचा उपयोग केला जात असे. बेलाच्या झाडाला श्रीवृक्ष म्हणत (स्कंद पु. माहे. केदार।३३/९) म्हणून बेलफळ हे श्रीफळ नारळाचे श्रीफळ हे प्राकृत नाव आहे. ते 'शिरःफलम्' (डोक्यासारखे फळ) या वर्णनपर संस्कृत वाक्प्रयोगातून बनले आहे. टीकाकारांनी बेलाला अपुष्पा वनस्पति म्हटले असले तरी बेलाला भरपूर फुले येतात व त्यापासून बेलिया नावाचे सुगंधी तेलही तयार करतात. अपुष्पा हे विशेषण अतिपुष्पा या अर्थाने वापरले असावे.

माया म्हणजे भूल, मोह, अज्ञान हे सर्व मनाचे विकार. ते आंतरिकच असतात. प्रस्तुत ऋचेत 'अंतरायाः' असा शब्द आहे. त्याचा सरळ अर्थ 'अडथळा प्रतिबंध' असा होतो व तो तेथे चांगला लागू पडतो. त्याचा ओढाताणीने आंतरिक असा अर्थ करण्याची जरूरी नाही. आपल्या प्रगतीत, अज्ञान, मोह हेच मोठे अडथळे असतात आणि वैभव मिळविण्यात तर विशेषच. मिळवलेले वैभवही टिकते वा जाते तेही बुद्धी शाबूत राहण्या न राहण्याने. 'अगोदर बुद्धी जाते, मग भांडवल जाते' ही म्हणच आहे. त्यामुळे 'मायान्तरायाः' म्हणजे मनाला, बुद्धीला भूल पाडणाऱ्या मायामोहाचा अडथळा, 'ऐश्वर्यमद' असा अर्थ घेणे अधिक योग्य.

उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह।
प्रादुर्भूतो सुराष्ट्रेऽस्मिन कीर्तिमृद्धिं ददातु मे ।।७।।

अस्मिन्	या अशा	मणिना सह	धनरत्नासह
सु-राष्ट्रे	थोर राष्ट्रात	मां उपैतु	माझ्याकडे येवोत.
प्रादुर्भूतः	मी जन्मलो आहे	कीर्तिम्	(आणि) कीर्ति
देव-सखः	परिश्रमशील देवमित्र	ऋद्धिम्	व वैभव
कीर्तिः च	आणि कीर्ति	मे ददातु	मला देवो

या थोर (भारत) राष्ट्रात मी जन्मास आलो आहे, हे माझे भाग्य होय. म्हणून परिश्रमशील सहाय्यक वर्ग व कीर्ति हे दोन्ही धनरत्नासह माझ्याकडे येवोत आणि मला कीर्ति व समृद्धी प्राप्त करून देवोत.

देवसखः म्हणजे कुबेर आणि मणि म्हणजे मणिभद्र नावाचा त्याचा खजिनदार म्हणून कुबेर आपल्या मणिभद्र नावाच्या कोशाध्यक्षासह माझ्याकडे येवो, असा अर्थ लावण्यात येतो हे खरे. पण वेदकाली कुबेर नावाचे देवतातत्त्व असल्याचे आणि ते 'देवसखः' या नावाने ओळखले जात असल्याचे निश्चित सांगता येत नाही. म्हणून या शब्दांच्या वेदांतील उल्लेखाच्या आधारे 'देवसखः' म्हणजे उद्योगीपणाने देवांशी सख्य जोडणारा, परिश्रमशील आणि 'मणि' म्हणजे रत्ने असा अर्थ घेतला आहे. 'देवसखः' हे सामासिक पद 'अंतोदात्त' असल्याने वैदिक पद्धतीने तो समास तत्पुरुष मानावा लागतो. तथापि समास तत्पुरुष मानला वा बहुव्रीही मानला तरी, परिश्रमशील म्हणून देवमित्र या अर्थाला बाध येत नाही.

मूळ ऋग्वेद संहितेत 'कुबेर' हे नाव आढळत नाही. पण ऋग्वेद खिलसूक्त क्र. २९-४२ (सातवळेकर प्रत) येथे कुबेर ते मुखं रौद्रं नंदिन्नानंदमावह।' असा कुबेराचा उल्लेख येतो. पूजेतील मंत्रपुष्पात येणारा 'कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।' हा कुबेराचा उल्लेख तै. आ. १/३१/६ येथील आहे.

अहीन द्वादशरात्र महासोमयाग, पुणे

''अहीन द्वादशरात्र महासोमयाग' दि. ६ फेब्रुवारी २०१४ ते २ मार्च २०१४, पवार मळा, समता विद्यालयासमोर, उरळी देवाची, पुणे येथे. **प. पू. सोमयाजी दीक्षित श्री. यज्ञेश्वर रंगनाथ सेलूकर महाराज** यांच्या हस्ते संपन्न झाला. या यज्ञाचे संपूर्ण श्रेय श्री. नरेंद्र नारायण पवार (नाना पवार) व श्री. सुनिल अंबादास गोसावी यांना जाते. ह्या यज्ञाचे मुख्य आकर्षण म्हणजे विशाल, महाकाय मंडप, यज्ञाच्या समोर असलेली अतिशय भव्य छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती, आणि प्रवेशद्वारासमोर असलेला भव्य असा नक्षत्रयज्ञमंडप. त्याचबरोबर दररोज सायंकाळी होणारे सामूहिक श्रीसूक्त हवन भागवताचार्य कु. अनुराधाताई शेटे यांच्या सुश्राव्य वाणीतून भागवत सप्ताह, भजन, किर्तन, प्रवचन अशा विविध कार्यक्रमांनी बहार आणला होता. ध्वजारोहणाच्या दिवशी सकाळी निघालेल्या शोभायात्रेला पाहून असं वाटलं की, खरोखरीच यज्ञसंस्थेला पुन्हा राजाश्रय प्राप्त झाला की काय? छत्र-चामर, उंट-घोडे, रथ, टाळ-मृदुंग, लेझीमपथक, कलशधारी स्त्रिया वगैरेंचा समावेश ह्यात होता.

ह्या यज्ञाच्या अनुषंगाने पुणे शहरात साधारण सहा महिने आधी शहराच्या निरनिराळ्या भागात सामुहिक श्रीसुक्त हवनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर सर्व शिष्यपरिवारातर्फे दोन मोठ्या काम्यष्टींचे आयोजन केले होते.

श्री. सुनील गोसावी हे प. पू. दादांचे शिष्य, त्यांच्या दोन वर्षांच्या अथःप्रयत्नाने ह्या यज्ञास मूर्त रूप प्राप्त झाले. त्याचबरोबर श्री नाना पवारांची थोरवी अशी की, त्यांनी तर आपल्या शेतातील नव्हे मळ्यातील पालक, मुळा, कांदा, उस, गहू अशी सर्व पिके वेळेआधी काढून यज्ञासाठी जागा उपलब्ध करून दिली. हे केवढे औदार्य! नाना पवार एकटेच ह्या कामात होते असे नाही तर त्यांचा संपूर्ण परिवार म्हणजे त्यांचे वडील-आई, सर्व भाऊ-भावजया, बहिणी, मुलं-सुना, मुली, विशेषतः त्यांच्या धर्मपत्नी, संपूर्ण मित्रवर्ग, सहकारी वर्ग ह्या सर्वांनी ह्या कार्यात अतिशय आनंदाने व उत्साहाने सहभाग घेतला होता.

स्वामी कैलास गिरी महाराज व स्वामी बलदेवानंदजी महाराज, उत्तर काशी ह्यांच्या शुभाशिर्वादाने हा यज्ञ संपन्न झाला. नक्षत्रयागाची माहिती व भारतीय परंपरा ह्यांचे विश्लेषण सातारा येथील श्री. पाठक गुरुजींनी अतिशय उत्तम प्रकारे एक महिना केले. मागील सोमयागाप्रमाणे यज्ञीय विधींचे विश्लेषण अतिशय सुंदर रीतीने लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सोमयाजी श्री. दीक्षित सुधाकर शास्त्री धर्मापुरीकर, श्री. बाळूमहाराज नाव्हेकर व डॉ. प्रा. लक्ष्मीश्वरजी झा (श्री. लालबहादुर शास्त्री संस्कृत विद्यालय, दिल्ली) ह्यांनी केले. तसेच अरूण भिसेगावकर, उमेश जोशी, सुरज देशमुख, लक्ष्मीकांत तोता, धनंजय जोशी, चैतन्य सकोजी, शैलेश चौथाईवाले, गजानन दाणी, गोविंद गवळी व इतर ह्यांचे सहकारी ह्या सर्वांनी तर ह्या यज्ञाच्या कार्यासाठी स्वतःला समर्पित केले होते.

यज्ञाची सुरुवात ध्वजारोहण, यज्ञसंकल्प, यज्ञदीक्षा ह्या कार्यक्रमाने झाली. त्यानंतर रोज प्रातःसवन, माध्यान्ह सवन व तृतीयसवन ह्या क्रमाने बारा दिवस सवन चालू होते. त्याचप्रमाणे प्रवर्ग्य उपसद् याग सकाळ-संध्याकाळ होत असे. प्रवर्ग्याच्या विशाल ज्वाळा पाहण्यासाठी लोकांची गर्दी होत असे. तद्वत रोज सायंकाळी होणारी सोमयागची महाआहूती ह्या यज्ञाचे विशेष आकर्षण ठरले. तसेच यज्ञाची समाप्तीही तितक्याच उत्साहात पुणे-नगर रोडवर असलेल्या तुळापूर येथे, छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी असलेल्या भीमा, भामा, कृष्णेच्या त्रिवेणी संगमावर अवभृत स्नानाने झाली.

।। यज्ञ नारायण भगवान की जय।।

पुढील आकर्षण : ''अभिजीत अतिरात्र महासोमयाग''

दि. २९ जाने. माघ शु. दशमी, गुरुवार ते दि. ४ फेब्रुवारी २०१५ माघ वद्य प्रतिपदा बुधवार.

यज्ञस्थळ - पोटे मैदान, गायत्री कॉलेजसमोर, महाड तालुका हॉलच्या बाजूला, कोळशेवाडी कल्याण - ४२१३०६ (पूर्व), जि. ठाणे

PRINTED MATTER

बुक पोस्ट

जा.क्र.

श्री. रा.रा. ______________________

____

____

प्रेषक : मा. सेक्रेटरी
महर्षी याज्ञवल्क्य संस्कृत विद्या प्रतिष्ठान,
यज्ञ भूमि, गंगाखेड,
जि. परभणी. (फोन नं.:०२४५३-२२२६२३)

महर्षी याज्ञवल्क्य संस्कृत विद्या प्रतिष्ठान, यज्ञभूमि, गंगाखेड. या संस्थेच्या मालकीचे यज्ञ-दर्शन पुष्प १४ हा माहितीचा अंक सेक्रेटरी श्री. प्रकाश पवार-पाटील यांनी मुद्रक स्टेप इन सर्व्हिसेस, कसबा पेठ पुणे येथे छापून संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केला